# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

Web Site:- www.rdtenagpur.org.in E-mail: ronagpur.dte@ gmail.com

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३


क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि-१-२/२०१३/ 317

दिनांक:- 29 JAN 2014

प्रति,

संचालक/प्राचार्य,

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच तत्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- **मराठा आरक्षाणबाबत,**

**शैक्षणिक संस्थामधील विविध विद्याशाखांमधील प्रवेशित तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांबाबत.**

संदर्भ :- १) मा. सह सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक :- मराठा२०१३/प्र.क्र.७६-२०१३/आस्था-२ दि. २७/०१/२०१४ रोजीचे.

२) या कार्यालयाचे पत्र क्रं. पृष्ठांकन/तंशिस/प्राकाना/शैवि-२/२०१३/२१७, दि. २१/०१/२०१४ रोजीचे.

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यांत येत आहे की, दि. ०१/०२/२०१४ रोजी मा.मंत्री, उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार (मा.श्री.नारायण राणे) यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षणाबाबत पुन्हा बैठक आयोजित करण्यांत आली असुन सदर बैठकीस मा.प्रधान सचिव, (उच्च व तंत्रशिक्षण) उपस्थित राहणार आहेत. **तरी ज्या संस्थांनी मराठा आरक्षणाबाबतची माहिती ऑनलाईन सादर केलेली नसेल किंवा अपूर्ण असेल त्यांनी लवकरात लवकर संस्थेने संस्थेच्या लॉगईन मधून ENTER MARATHA CANDIDATE DETAIL'S या लिंकवर सदरची सर्व अभ्यासक्रम व विद्याशाखेची माहिती भरावी . ही माहिती शासनास त्वरीत सादर करावयाची असल्यामुळे दि. ३१ जानेवारी २०१४ पर्यंत भरुन पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

अतितात्काळ

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : मराठा २०१३/ प्र.क्र. ७६-२०१३/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७.१.२०१४

प्रति,

**सह सचिव (व्यवसाय शिक्षण) / उप सचिव (तंत्रशिक्षण),**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय :** मराठा आरक्षणाबाबत...
शैक्षणिक संस्थांमधील विविध विद्याशाखांमधील प्रवेशित तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांबाबत

**संदर्भ :** १. शासनपत्र समक्रमांक दिनांक २१.१२.१३ व स्मरणपत्र दिनांक २७.१२.१३, दि. २.१.१३, दि. १५.१.२०१४

**महोदय,**

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी महाविद्यालयातील (शिक्षण संस्थांमधील) किती विद्यार्थी / विद्यार्थीनींनी सन २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ या शैक्षणिक वर्षांमध्ये विविध विद्याशाखांमध्ये प्रवेश घेतला व उत्तीर्ण झाले याबाबतची विहीत विवरणपत्रामध्ये मागविण्यात आलेली माहिती यापूर्वीच एकत्रितपणे साप्रविकडे सादर करणे अपेक्षित होते.

दिनांक २१.१.२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता मा. मंत्री, उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार (मा. श्री. नारायण राणे) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत या कार्यासनाकडे उपलब्ध माहिती सहसचिव (आस्था) यांनी सादर केली. मात्र, सदर माहितीमध्ये आपल्या उपविभागाची माहिती समाविष्ठ नसल्याने, अपुऱ्या माहितीबद्दल मा. मंत्री महोदयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. **दिनांक १.२.२०१४ रोजी मा. मंत्री, उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार (मा. श्री. नारायण राणे) यांच्या अध्यक्षतेखाली** पुन्हा बैठक आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीस **मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण)** उपस्थित राहणार आहेत.

आपणांस विनंती आहे की, आपल्या उपविभागांतर्गत सर्व विद्याशाखांमधील विद्यार्थी व त्यातील मराठा विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्त्व यांची माहिती विहीत विवरणपत्रामध्ये विनाविलंब उपलब्ध करुन देण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात (**शासकीय व खाजगी** महाविद्यालये /औद्योगिक प्रशिक्षण संस्थांबाबतची माहिती स्वतंत्रपणे नमूद करावी).

**सदर बाब अत्यंत महत्त्वाची व तातडीची असल्याने परिपूर्ण माहिती वेळेत उपलब्ध करुन देण्याबाबत आपण स्वत: जातीने लक्ष द्यावे.**

( शैला तारगे-पाटील )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

01/02/2014
T.S. 4 & 5